दै. सत्यप्रभा दि. 03/09/23

## पत्नीचा गळा कापून खून

# आरोपी पतीस अटक



भोकर, दि. २ (ता.प्र.) - यवतमाळ जिल्ह्यातील ढाणकी ता. उमरखेड येथे सासरवाडीत जाऊन पत्नीचा सुरीने गळा कापून खून करुन पसार झालेल्या आरोपी पतीस भोकर पोलिसांनी आज सिताफीतीने अटक केली आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की भोकर तालुक्यातील चिंचाळा येथील शिवाजी दशरथ नारमवाड याने उमरखेड तालुक्यातील ढाणकी येथे आपल्या माहेरी वडिलांकडे गेलेल्या पत्नी कविता शिवाजी नारमवाड हिचा चारित्र्याच्या संशयावरून धारदार सुरीने गळा कापून खून केला होता.ही घटना २७ जुलैला पहाटे ४ च्या सुमारास घडली होती. त्यानंतर महिलेचा पती शिवाजी नारमवाड हा फरार झाला होता.

या प्रकरणी पोलीस स्टेशन बिटरगाव बु. तालुका उमरखेड जिल्हा यवतमाळ येथे आरोपी शिवाजी नारमवाड याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी हा फरार झाल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते सदरील गुन्हातील आरोपी भोकर पोलिसांना चिंचाळा ता.भोकर येथे असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरुन भोकर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील, पोलीस हवालदार सय्यद मोहीम, भीमराव जाधव, राजेश दुथडे वडगावकर, गृहरक दलाचे अझर काजी यांनी शनिवार दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार चिंचाळा येथे जाऊन मोठ्या सिताफिने आरोपीस अटक केली. दरम्यान आरोपीस भोकर पोलीस स्टेशन येथे आणून पोलीस स्टेशन बिटरगाव(बु) जिल्हा यवतमाळ यांच्या ताब्यात दिले आहे. प